**रे. द. क्र. ४०/२०११.**

**<u>अर्ज नि.क्र.५१ वरील आदेश</u>**
(पारीत दि.१६.०४.२०२५)

०१. अर्ज नि.क्र.४१ वरील आदेशा प्रमाणे वादमिळकतीवरील पत्र्याचे शेड, दुकान, लाकुडफाटा व इतर साहीत्य असा अडथळा दूर करुन वादमिळकत पूर्ववत स्थितीत करुन मिळण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याकरीता डी.एच. तर्फे प्रस्तुत अर्ज.

०२. प्रस्तुत दरखास्त ही नियमित दिवाणी दावा क्र.८२/२००२ मधील दिनांक २०/११/२००८ रोजीच्या हुकूमनाम्या प्रमाणे दावा कलम १क या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ याने खणलेले गड्डे बुजवून मिळकत पूर्ववत करुन देण्याच्या आदेशात्मक मनाई हुकूमाच्या अंमलबजावणी करीता दाखल करण्यात आली आहे. सदर हुकूमनाम्या प्रमाणे दिनांक १८/०६/२०१४ रोजी अर्ज नि.क्र.२७ वरील आदेशावरुन कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार कोर्ट कमिशनर यांनी कार्यवाही करुन दि.१२/०६/२०१५ रोजी नि.क्र.३८ प्रमाणे आपला अहवाल सादर केला. त्यानंतर दरखास्तदार यांनी नि.क्र.४१ प्रमाणे अर्ज सादर करुन अपिल प्रलंबित असताना जे.डी. यांनी दि.१९/०८/२००९ रोजी पुन्हा दावा कलम १क या मिळकती मधील काही क्षेत्रात दांडगाईने लाकडे, पत्र्याचे तात्पुरते शेड व इतर किरकोळ असे साहीत्य टाकून केलेला अडथळा दूर करुन मागण्याकरीता न्यायालयीन आयुक्ताची मागणी केली होती. परंतु, सदर अर्ज दि.२४/१०/२०१६ रोजी नामंजूर करण्यात आला होता. सदर आदेशा विरुध्द डी.एच. यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.७०७२/२०१७ दाखल केले. सदर पिटीशन दि.२६/११/२०२४ रोजी मंजूर करण्यात आले. त्या आदेशाप्रमाणे प्रस्तुत दरखास्त प्रकरणातील अर्ज नि.क्र.४१ वरील दि.२४/१०/२०१६ रोजीचा आदेश रद्द ठरवून सदर अर्ज नि.क्र.४१ हा मंजूर करण्यात आला. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशा प्रमाणे दावा कलम १क या मिळकतीवरील अतिक्रमण हे न्यायालयीन आयुक्तामार्फत काढून मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज.

०३. या ठिकाणी प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की, मा.उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.७०७२/२०१७ मधील दि.२६/११/२०२४ रोजीच्या आदेशात प्रस्तुत दरखास्त प्रकरण हे सदर आदेश प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत निकाली काढण्यास निर्देशित केले आहे. प्रस्तुत रिट पिटीशनची प्रत ही आवक क्र.४३७ नुसार दि.१४/०२/२०२५ रोजी या न्यायालयाला प्राप्त झाली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रस्तुत दरखास्त ही दि.१४/०५/२०२५ पूर्वी निकाली काढणे अनिवार्य ठरते. प्रस्तुत अर्ज नि.क्र.५१ हा दिनांक ०१/०१/२०२५ रोजी दाखल करण्यात आला. त्यानंतर जे.डी. यांना अर्ज नि.क्र.५४, ५५ व ५७ प्रमाणे पुरेशी संधी देवून सुध्दा त्याने प्रस्तुत अर्जाला आपले म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे दि.०७/०४/२०२५ रोजीच्या आदेशावरुन प्रस्तुत अर्ज हा जे.डी. विरुध्द विना म्हणणे पुढे चालविण्यात आला. जे.डी.च्या कथना प्रमाणे सदर रिट मधील निकालावर नाराज होवून त्याने मा.उच्च न्यायालय येथे दि.१३/१२/२०२४ रोजी रिव्हीजन पिटीशन क्र.३६३०४/२०२४ दाखल केले आहे. परंतु, जे.डी. याने आजपावेतो सदर रिव्हीजन पिटीशन मधील कुठलीही प्रगती अहवाल किंवा या आदेशा विरुध्द स्थगिती आदेश दाखल केलेला नाही. शिवाय, आज देखील जे.डी. व त्याचे विधीज्ञ वारंवार पुकारा करुन गैरहजर आहेत. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन क्र.७०७२/२०१७ मधील दि.२६/११/२०२४ रोजीच्या आदेशा प्रमाणे प्रस्तुत दरखास्त प्रकरणातील अर्ज नि.क्र.४१ मध्ये दर्शविल्या प्रमाणे दावा कलम १क या मिळकतीवर जे.डी. याने उभारलेले पत्र्याचे शेड, लाकूडफाटा व इतर साहीत्य हटवून सदर मिळकत पूर्ववत करुन मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे :-

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. ॲड.श्री. आत्माराम यशवंत पाटील यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी अर्ज नि.क्र.४१ वरील आदेशा प्रमाणे दावा

कलम १क या मिळकतीवर उभारलेले पत्र्याचे शेड, दुकान, भंगार व इतर लाकडी साहीत्य काढून दावा मिळकतीवरील अडथळा दूर करावा.

४. जर जे.डी. क्र.१ याने अडथळा दूर करण्यास हरकत किंवा अडथळा निर्माण केल्यास डि.एच. यांना स्वखर्चाने सदर अडथळा दूर करण्याची मुभा राहील आणि झाला खर्च जे.डी. क्र.१ याचे कडून वसूल करुन मिळण्यास डी.एच. पात्र राहील.

५. सदर आदेशाची अंमलबजावणीस जे.डी. अगर जे.डी. तर्फे इतर इसमांमार्फत अडथळा निर्माण होवून सार्वजनिक शांतता भंग होण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास डी.एच. यांना पोलीस मदत घेण्याची मुभा राहील.

६. सदर आदेशाचे अंमलबजावणीस पोलीस मदत लागल्यास संबंधीत पोलीस ठाणे किंवा पोलीस निरिक्षक/अधिकारी यांनी कायदेशीर फी चा भरणा करुन पोलीस मदत द्यावी.

७. डी.एच. यांनी कोर्ट कमिशन फी रक्कम रुपये ५,०००/- जमा करावी.

८. कोर्ट कमिशन फी जमा केल्यानंतर कमिशन रिट देण्यात यावे.

९. न्यायालयीन आयुक्त यांनी रिट प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला अहवाल सादर करावा.

( एस.डी. कु-हेकर )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
कराड.

दि.१६.०४.२०२५.
ठिकाण- कराड.